# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.04.2025** **वारःसोमवार**

---

•पहलगाम हल्ल्यातल्या दोषींना आणि कारस्थानकर्त्यांना सणसणीत प्रत्युतर देणार- पंतप्रधानांचा पुनरुच्चार

•शहरांचा चेहरामोहरा बदलण्यासाठी शहर विकासावरील संवादांची गरज असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

•महिलांच्या तिरंगी क्रिकेट मालिकेत भारताची विजयी सुरुवात आणि

•विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा

**मोदी-मनकीबात**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील दोषींना आणि कटकारस्थान करणाऱ्यांना सणसणीत प्रत्युत्तर मिळेल, असं सांगून हा हल्ला काश्मीरच्या बदलत्या परिस्थितीमुळं दहशतवाद्यांच्या नेतृत्वाचं हताशपण आणि त्यांच्या भ्याडपणाचं निदर्शक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरील मन की बात या मासिक संवादाच्या १२१व्या भागात ते काल बोलत होते. बदलत्या काश्मिरवर झालेल्या या हल्ल्याविषयी बोलताना ते म्हणाले...

दहशतवादाविरोधातल्या लढाईत देशाची एकजूट ही सर्वात मोठी ताकद असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. या हल्ल्यानंतर जागतिक स्तरावरून, जागतिक नेत्यांकडून भारताकडे संवेदना व्यक्त केली जात आहे असं सांगून घटनेतल्या पीडीत कुटुंबियांना न्याय देण्याचा विश्वास मोदींनी व्यक्त केला.

पंतप्रधानांनी इस्रोचे माजी संचालक दिवंगत डॉक्टर के कस्तुरीरंग यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच भारताचा पहिला उपग्रह आर्यभट्टच्या प्रक्षेपणाला पन्नास वर्ष झाल्याच्या आठवणींना उजाळा दिला. भारत अंतराळ महासत्ता झाला असून, या क्षेत्रात जागतिक नेतृत्व म्हणून पुढे येत आहे. देशातल्या तरुणांचा या क्षेत्रातला सहभागही स्टार्टअपच्या माध्यमातून वाढल्याचं त्यांनी नमूद केलं. मन की बातच्या या भागात, भारताचा विचार संकटकाळातला मित्र म्हणून केला जात असल्याचं ऑपरेशन ब्रह्माचा उल्लेख करत मोदी यांनी सांगितलं. त्याचबरोबर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या नव्या सचेत ॲपविषयी माहिती देत नैसर्गिक आपत्तीपासून स्वतःचा बचाव करण्याचं आवाहन देशवासियांना केलं.

**<u>एनआयएपहलगाम</u>**

गृहमंत्रालयाच्या आदेशानुसार पहलगाम हल्ल्याचा तपास एनआयए म्हणजेच राष्ट्रीय तपास संस्थेकडे औपचारिकरित्या सोपवण्यात आला आहे. गेल्या बुधवारपासून तपास संस्थेचं पथक पुरावे शोधण्यासाठी घटनास्थळी दाखल झालं आहे. घटनेच्या साक्षीदारांची चौकशी केली जात आहे. शहरातल्या येण्या-जाण्याच्या स्थळांचीही बारकाईनं तपासणी केली जात असल्याच संस्थेनं प्रकाशित केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>पाकनागरिक-फडणवीसट्वीटर</u>**

महाराष्ट्रात राहाणारे सर्व पाकिस्तानी नागरीक सापडले असून कोणीही हरवलेले नाहीत असं मुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल पुण्यात बातमीदारांशी बोलत होते. गृहविभागाच्या आकडेवारीनुसार राज्यातल्या एकंदर ४८ शहरांमध्ये ५ हजार २३ पाकिस्तानी नागरिक राहतात. या सर्व नागरिकांना देशातून पाठवून दिलं जाईल, असंही फडणवीस यांनी नमूद केलं. दरम्यान, अटारी सीमेवरुन पाकिस्तानी नागरिक त्यांच्या देशात परत जाण्यास सुरुवात झाली आहे.

**<u>नौदलसज्जता</u>**

भारतीय नौदलानं जहाजविरोधी युद्धाचा काल सराव केला. कोणत्याही वेळी, कोठेही, कशाही प्रकारे देशाच्या सागरी हिताच्या सुरक्षिततेसाठी नौदल सज्ज, सक्षम असल्याची घोषणा नौदलानं या सरावातून केली. संरक्षण राजनाथ सिंग यांनी सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांची भेट घेऊन भारताच्या संरक्षण सज्जेतवर चर्चा केली.

**<u>मुख्यंमत्रीअर्बनडायलॉग</u>**

महाराष्ट्रातली अर्धी लोकसंख्या पाचशे शहरांमध्ये एकवटली असून, उर्वरीत लोकसंख्या चाळीस हजार गावांमध्ये रहाते आहे. शहरांचा चेहरा बदलू शकलो तर गावांतल्या लोकसंख्येला आपण उत्तम जीवन देऊ शकतो. त्यासाठी 'पुणे अर्बन डायलॉग' सारख्या चर्चांची गरज आहे. असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं.

यशदा, बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट, इंटरनॅशनल सेंटर आणि पुणे महानगरपालिकेनं संयुक्तपणे आयोजित यशदा इथं आयोजित केलेल्या 'पुणे अर्बन डायलॉग-आव्हानं आणि उपाय' या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पुणे महानगर प्रदेश विकास आराखडा रद्द करून रस्त्यांचं जाळं निर्माण करणं आणि नगर रचना योजना राबवण्याचा विचार असल्याचं सांगून, शेवटपर्यंत वाहतूक सुविधा नसल्यास सार्वजनिक वाहतुकीचा सक्षम वापर होत नसल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. शहरातल्या वाढत्या संधींमुळे वाढतं नागरिकीकरण आणि अपुऱ्या सुविधांविषयी बोलताना फडणवीस म्हणाले....

**<u>कर्करोगनड्डा</u>**

येत्या वर्षात कर्करोगाच्या उपचारांवर अधिक लक्ष केंद्रीत केलं जाणार असून, देशात मोठ्या प्रमाणावर उपचार सुविधा निर्मितीवर भर देणार असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं सांगितलं.

शासकीय कर्करोग रुग्णालयातल्या टू बीम युनिट या कर्करोगावरील अतिविशेष उपचार देणाऱ्या अत्याधुनिक यंत्र प्रणालीचं आणि कर्करोग संस्थेच्या इमारतीच्या विस्तारीत इमारतीचं लोकार्पण करताना ते बोलत होते. कर्करोगाचं निदान वेळेवर आणि लवकर करण्यासह ९० टक्के रुग्णांवर एक महिन्याच्या आत उपचार सुरू करण्यात आल्याचंही नड्डा यांनी सांगितलं. कर्करोग ही प्राधान्याची बाब ठरवून २०० निगा केंद्र उभारली जाणार आहेत. निदान क्षमता वाढवल्यानं मुखाचा कर्करोग, महिलांमधला स्तनांचा कर्करोग यांचं वेळेत निदान झाल्यानं वेळेत उपचार सुरू होऊ शकल्याची माहितीही नड्डा यांनी यावेळी दिली.

छत्रपती संभाजीनगरमध्ये टू बीम सारखी कर्करोगावरील उपचाराची अद्ययावत सुविधा उपलब्ध होत असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी समाधान व्यक्त केलं.

**<u>अतिदुर्गमकटेझरीएसटी</u>**

नक्षलवाद्यांचं कटेझरी, अशी ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातल्या कटेझरी गावात प्रथमच राज्य परिवहन महामंडळाची बस पोहोचली. पोलिस विभागाच्या प्रयत्नांतून पोहोचलेल्या एसटी बसचं स्थानिक नागरिकांनी ढोलताशांच्या गजरात स्वागत केलं. या बसमुळे कटेझरी आणि त्याजवळील १०-१२ गावांतील नागरिकांची सोय होणार आहे. गडचिरोली पोलिस दलाकडून दुर्गम भागातल्या नागरिकांचं जीवन सुसह्य करण्यासाठी मागील पाच वर्षांमध्ये चारशे किलोमीटरपेक्षा अधिक लांबीचे रस्ते आणि ५९ पुलांचं बांधकाम पोलिस संरक्षणात पूर्ण करण्यात आलं.

**<u>सोलापूरपाऊस</u>**

सोलापूर जिल्ह्यात काल दिवसभर उन्हाचा कडाका जाणवत होता. मात्र संध्याकाळी पावसानं हजेरी लावल्यानं नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक भागात वीज गेल्यानंही नागरिक त्रस्त झाले होते. या पावसाचा फटका आंबा बागांना बसणार आहे.

**<u>भंडारापाऊस</u>**

भंडाऱ्यातही काल संध्याकाळी पावसानं हजेरी लावली. हवेत गारवा निर्माण झाला आणि नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला. जिल्ह्यात आजही पावसाचा अंदाज आहे.

**<u>पाऊस</u>**

सांगली जिल्ह्यातील तासगाव आणि मिरज तालुक्यात काल दुपारी पाऊस झाला. त्यामुळं हवेत गारवा निर्माण झाला.

**<u>महिलाक्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमधे, भारत, श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तिरंगी एकदिवसीय क्रिकेट मालिकेत, काल श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ९ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेचा डाव ३८ षटकं आणि एका चेंडूत १४७ धावांवर आटोपला. विजयासाठी १४८ धावांचं आव्हान भारतानं २९ षटकं आणि ४ चेंडूत एका गड्याच्या मोबदल्यात पूर्ण केलं. प्रतिका रावलनं नाबाद ५०, तर हरनील देओलनं नाबाद ४८ धावा केल्या. स्मृती मंधानानं ४३ धावांचं योगदान दिलं.

**<u>हवामान</u>**

मराठवाड्यात उष्ण आणि दमट हवामान राहील. विदर्भात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह गडगडाटी पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.